आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्याकाळी ७.०० वाजता

७ ऑक्टोबर २०२३ – शनिवार

**ठळक बातम्या**

- उसाच्या मळीवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरुन ५ टक्के करण्याचा जीएसटी परिषदेचा निर्णय

- हसन मुश्रीफ आणि त्यांच्या तीन मुलांनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचं पीएमएलए न्यायालयाचं निरीक्षण

- महादेव बेटिंग ॲप प्रकरणी ईडीचे मुंबईत ५ ठिकाणी छापे

  **आणि**

- आशियाई स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंना आज ६ सुवर्ण पदक, एकूण पदकांची संख्या १०७ वर

**<><><><><>**

जीएसटी परिषदेनं उसाच्या मळीवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरुन ५ टक्क्यांवर आणला आहे. यामुळं ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जीएसटी परिषदेच्या ५२ व्या बैठकीनंतर नवी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषेदत सांगितलं. भरड धान्याचा ७० टक्क्यांहून अधिक समावेश असलेल्या सुट्या पीठावर जीएसटी न लादण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. पॅकिंग केलेल्या पीठावर ५ टक्के जीएसटी लागेल. जीएसटी लवादासाठीच्या सदस्यांची वयोमर्यादाही आजच्या बैठकीत वाढवली. पाणी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य, साफसफाई, कचरा व्यवस्थापन, झोपडपट्टी विकास यासारख्या सुविधांना जीएसटीतून सूट देण्याची शिफारसही आजच्या बैठकीत परिषदेनं केली.

<><><><><>

राज्यातल्या शेतीचं आरोग्य नको त्या मात्रांमुळे खराब झाल्यानं कर्बचे प्रमाण वाढवण्यासाठी कृषी विभाग आता माती परीक्षणावर भर देणार आहे. यासाठी टपाल कार्यालयांची मदत घेतली जाणार आहे, अशी माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. लातूरमधल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. तालुका स्तरापर्यंत माती परीक्षण केंद्रं अद्यायावत करून माती परीक्षणासाठी आता शेतकरी आपल्या मातीचा बॉक्स माती परीक्षण केंद्राला पोस्टाद्वारे पाठवू शकेल. मातीचं परीक्षण होऊन सात दिवसात शेतकऱ्याला मातीचा आरोग्य अहवाल मिळेल, असं मुंडे यांनी सांगितलं.

<><><><><>

मानव आणि वन्यप्राण्यांमध्ये होणाऱ्या संघर्षाच्या घटना आणि वन्यप्राण्यांमुळं होत असलेलं शेत-पिकांचं नुकसान टाळण्यासाठी यवतमाळ जिल्ह्याच्या १६ तालुक्यातल्या शेतकऱ्यांना बॅटरीवर चालणाऱ्या झटका मशीन देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आज ही माहिती दिली. प्रायोगिक तत्वावर यवतमाळ जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातल्या एक हजार लाभार्थ्यांना या मशीन दिल्या जाणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

येणाऱ्या काळात देशाची अर्थव्यवस्था अव्वल स्थानावर येणार आहे. युवकांसमोर त्यातली गुणवत्ता आणि सर्वसमावेशकता कायम राखण्याचे मोठं आव्हान राहणार आहे. असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यातील

गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाच्या 29 व्या वार्षिक दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

<><><><>

नॅक अर्थात राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणी राज्य सरकारनं केंद्राकडे केली आहे. मूल्यांकनाची प्रक्रिया सोपी आणि परवडणारी केली तर अधिकाधिक संस्थांकडून मूल्यांकन करून घेण्यास गती मिळेल. प्रक्रियेतले गैरप्रकार टाळायला मदत होईल, अशा आशयाचं पत्र राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना दिलं आहे.

<><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि  उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या बारावीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज येत्या सोमवारपासून ६ नोव्हेंबरपर्यंत भरण्यात येणार आहेत. हे अर्ज ‘सरल डेटाबेस’वरून ऑनलाइन पद्धतीनं संबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत भरण्यात येतील. परीक्षेचा ऑनलाइन अर्ज आणि अधिक माहिती राज्य मंडळाच्या ‘www.mahahsscboard.in’ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><>

मंत्री हसन मुश्रीफ आणि त्यांच्या तीन मुलांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचं निरीक्षण पीएमएलए कोर्टाकडून नोंदवण्यात आलं  आहे. मुश्रीफ यांचे

स्वीय सहाय्यक आणि निकटवर्तीय महेश गुरव यांचा अटकपूर्व जामीन फेटाळताना न्यायालयानं ही टिप्पणी केली आहे. शेतकऱ्यांकडून घेतलेले पैसे आस्थापनेमध्ये गुंतवल्याचही न्यायालयानं म्हटलं आहे. सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखाना मनी लॉण्ड्रिंग प्रकरणावरील सुनावणी सध्या मुंबईतल्या विशेष पीएमएलए न्यायालयात  सुरू आहे.

दरम्यान, मुश्रीफ यांच्या तीनही मुलांनी अटकपूर्व जामीनासाठी न्यायालयात धाव घेतली आहे. विशेष पीएमएलए कोर्टाने तिघांच्याही अटकपूर्व जामीनावरील निकाल राखून ठेवला आहे.

**<><><><><>**

महादेव बेटिंग ॲप प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयानं मुंबईत पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी केली आहे. 'कुरैशी प्रोडक्शन्स'ला सिनेमा बनवण्यासाठी महादेव ॲपचा प्रवर्तक सौरभ चंद्राकर आणि रवि उप्पल यांच्याकडून पैसे मिळाले आहेत. हाच धागा धरून ईडीनं मुंबईतल्या या प्रॉडक्शन हाऊसवर छापेमारी केली आहे.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यात आज कोतवाल पदाच्या परीक्षेचा पेपर फुटला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं याप्रकरणी जालना शहरातल्या एका परीक्षा केंद्रावरून पेपर लिहिण्यासाठी इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसचा वापर करणाऱ्या तीन संशयितांना ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

गडचिरोली पोलिसांसमोर रजनी उर्फ कलावती समय्या वेलादी या महिला नक्षलवाद्यानं आज आत्मसमर्पण केलं. तिच्यावर ११ लाख रुपयांचं बक्षीस होतं. २००९ मध्ये छत्तीसगडमधल्या फरसेगड दलममध्ये ती भरती झाली होती. ४ चकमकी, १ खून आणि १ जाळपोळीच्या गुन्ह्याची तिच्या नावावर नोंद आहे. आत्मसमर्पण योजनेंतर्गत तिला साडेचार लाख रुपयांची मदत करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. २०२२ पासून आतापर्यंत १३ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्याचे नीलोत्पल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्राथमिक स्तरावरील आरोग्य सुविधांसाठी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांनी म्हटलं आहे. प्रादेशिक समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या नाशिक इथल्या दोन दिवसीय परिषदेच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी अधिक आणि स्मार्ट काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या परिषदेत नाशिक जिल्ह्यातल्या पळसे आरोग्य केंद्राला पुरस्कार देण्यात आला.

**<><><><><>**

मराठा आरक्षण दडपण्यासाठी सरकारनं  माझ्यावर दबाव टाकण्याचे  अनेक प्रयत्न केले असून त्याला बळी न पडता गोरगरीब मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय सरकारला सुट्टी नाही. असं मराठा आरक्षणाचे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज माढा तालुक्यातील कुर्डू इथल्या सभेत बोलत होते.

सरकारला दिलेला चाळीस दिवसाचा अवधी १४ ऑक्टोबरला संपत असून त्यानंतर मराठा आरक्षण आंदोलनाची दिशा ठरवली जाईल असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

भाजप हा मोठा पक्ष आहे, त्यांच्या बरोबर मोठी माणसे आल्याने त्यांना लहान पक्षांची आता गरज राहिली नसल्याची प्रतिक्रिया राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी दिली आहे. पक्षाची जन स्वराज्य यात्रा मोहोळ इथं आली, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><>**

भारतीय खेळाडूंनी चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई स्पर्धांमध्ये १०७ पदक मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ऑलिम्पिक, राष्ट्रकूल स्पर्धा आणि आशियाई स्पर्धा या तीन महत्त्वांच्या स्पर्धांपैकी भारतानं कधीही एवढी पदकं जिंकली नव्हती. नवी दिल्लीत २०१० मध्ये झालेल्या राष्ट्रकूल स्पर्धांमध्ये भारताला १०१ पदकं मिळाली होती.

महिला आणि पुरुष कबड्डी, पुरुष क्रिकेट, बॅडमिंटन दुहेरी, महिला आणि पुरुषांची कंपाऊड तिरंदाजी अशा ६ सुवर्णपदकांची कमाई भारतीय खेळाडूंनी आज केली.

पुरुषांच्या कब्बडी संघानं इराणला, महिलांच्या कब्बडी संघानं तैपेईला अंतिम सामन्यात पराभूत केलं. चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी या जोडीनं देशाला पहिल्यांदाच या स्पर्धांमध्ये पुरुष दुहेरीत सुवर्णपदक मिळवून दिलं.

अफगाणिस्तान विरुद्ध झालेला क्रिकेटचा अंतिम सामना पावसामुळं रद्द झाला आणि भारतीय संघाला सुवर्णपदक मिळालं. ओजस देवतळे यांनं कंपाऊड तिरंदाजीत सुवर्ण तर अभिषेक वर्मानं कांस्य पदक जिंकलं. ज्योती सुरेखा वेन्नम हिनंही याच प्रकारात सुवर्ण आणि आदिती स्वामीनं कांस्य पदक पटकावलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणातल्या तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातलं हवामान कोरडं राहील, असा अंदाज पुणे हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**